
ISBN : 978-93-83672-76-9



# सत्यशोधक अण्णा भाऊ साठे : अनुभवाचे विद्यापीठ

संपादक

डॉ. रमेश लांडगे

डॉ. सविता कोठावळे

डॉ. कृतिका खंदारे

ISBN : 978-93-83672-76-9


१५. अण्णाभाऊंच्या साहित्यातील स्त्री जीवन – एक चिकीत्सक अभ्यास ८५

प्रा.डॉ. क्षिरसागर बी.एस.

१६. अण्णाभाऊंच्या 'पुढारी मिळाला' वगनाट्यातील राजकीय वास्तविकता ९०

प्रा.डॉ. कालिदास दिनकर फड

१७. अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील क्रांतीवादाचा अभ्यास ९३

प्रा. हुरगुळे एन आर

१८. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जीवन आणि साहित्य ९९

प्रा.डॉ. जाधवर बापू देवराव

१९. दलित साहित्य आणि अण्णाभाऊ साठे १०३

कुरिल मिनाक्षी पुनमचंद

२०. अण्णाभाऊ साठे : व्यक्ती आणि वाड्.मय १०९

डॉ. पैकेकरी संगीता पांडुरंग

२१. अभिजात साहित्यिक अण्णाभाऊ साठे : काल, आज आणि उद्या ११८

प्रा. प्रदीप मोहिते

२२. अण्णाभाऊंच्या साहित्यातील स्त्रीमुक्तीवाद – एक अभ्यास १२३

प्रा.डॉं.भाकरे आर बी

२३. अण्णा भाऊ साठे के उपन्यासों में अभिव्यक्त विद्रोह १२८

वाढेकर रामेश्वर महादेव, ज्योती शशिकांत कांबळे

२४. मानव मुक्तीचे प्रणेते : अण्णाभाऊ साठे १३२

डॉ. भालेराव जे.के.

२५. अण्णा भाऊ साठे : शाहिरी काव्यातील विद्रोह १३६

सोनाली लक्ष्मणराव इंगळे

२६. आणाभाऊसाठे यांच्या वाङमयातील मानव मुक्तीचा विचार १४०

प्रा. शामल जाधव , प्रा. शेख गफूर अहमद

२७. आण्णा भाऊ साठे : व्यक्ति एवं वाङमय ('संघर्ष' के विशेष संदर्भ में) १४४

डॉ. अनघा तोडकरी

२८. अण्णा भाऊ साठे : समतावादी विचारवंत १४६

प्रा. ज्ञानेश्वर बनसोडे , डॉ. महादेव गव्हाणे

२९. आण्णाभाऊ साठे यांच्या कथेतील समाज वास्तव १५०

प्रा. श्रीमती रत्ना लाला जवरास

ISBN : 978-93-83672-76-9

२८.

# अण्णा भाऊ साठे : समतावादी विचारवंत

**प्रा. ज्ञानेश्वर बनसोडे**
*राज्यशास्त्र विभाग, राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर*
**डॉ. महादेव गव्हाणे**
*प्राचार्य, राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर*

---

समता हे मानवी जीवनातील अत्यंत महत्त्वपूर्ण असे मूल्य आहे. आधुनिक जगामध्ये सामाजिक समतेचे तत्त्व स्विकारण्यात आले आहे. सामाजिक समता म्हणजे समाजातील सर्व व्यक्तींची प्रतिष्ठा व दर्जा समान असणे होय. या तत्त्वांचा आविष्कार अण्णा भाऊंच्या अनेक साहित्यकृतींमधुन प्रतिबिंबित झाला आहे. समता हे मानवाच्या उन्नत अवस्थेतील मुलभूत मुल्य आहे. १७७६ मध्ये अमेरिकन राज्यक्रांतीच्या शिल्पकाराने निर्मित्याने सर्व माणसांना समान निर्मिले असुन त्या सर्वांना काही अदेय स्वरुपाचे अधिकार बहाल केले आहेत. अशी घोषणा करणारा स्वातंत्र्याचा जाहिरनामा प्रसिद्ध केला. तर १९१७ च्या रशियन राज्यक्रांतीनेही समाजवादी समाजाच्या निर्मितीचा संकल्प जाहिर केला असतानाही समाजामध्ये जातीभेद, विषमता निर्माण होताना दिसून येते. जो माणुस विषमतावादी व्यवस्थेने माणूस म्हणून सन्मानाने जगू न देता अपमानित केलेले असते. त्याच्या मनात विषमतावादी व्यवस्थेबद्दल चीड असते आणि समता या मूल्याबद्दल आदर वाटत असतो. अण्णा भाऊ साठेंनाही या देशातील विषमतावादी व्यवस्थेचे चटके बसले आहेत. म्हणून त्यांना विषमतेविरूद्ध चिड आहे आणि समता या मूल्याबद्दल आदर आहे. त्यांच्या साहित्यातून पदोपदी विषमतेबद्दलची चीड आणि समतेबद्दलचा आदर प्रकट झालेला दिसुन येतो. देशातील आर्थिक, सामाजिक व राजकीय अशा प्रकारच्या विषमतेविरूद्ध अण्णा भाऊ साठे यांनी आवाज उठवला आहे. आर्थिक विषमतेविरूद्ध जागतिक पातळीवर आवाज उठवणा-या कार्ल-मार्क्सच्या विचारांचा प्रभाव अण्णाभाऊंच्या मनावर आहे. तसाच सामाजिक विषमतेविरूद्ध आवाज उठवणा-या डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचाही प्रभाव त्यांच्या मनावर आहे.

वर्गसंघर्ष हा समाजव्यवस्थेत विषमता निर्माण करतो. समाजात हे वर्ग कसे तयार होतात आणि कोणते वर्ग शोषक व कोणते वर्ग शोषित असतात या दोन्ही वर्गात संघर्ष अटळ असतो असे मार्क्सने स्पष्ट केले आहे. आजपर्यंतचा इतिहास हा वर्गसंघर्षाचा इतिहास आहे. असे मार्क्स म्हणतो. पण भारत हा वर्गामध्ये विभागलेला नसुन वर्णव्यवस्थेत विभागला आहे. मनुस्मृतीने चार वर्णामधील अनेक जाती आणि पोटजातीमध्ये समाजाची विभागणी केलेली आहे. सर्वात वरचा वर्ण श्रेष्ठ. त्यांच्याकडेच सर्व सत्ता. खालचा शुद्र कनिष्ठ वर्ण उच्च वर्णातील जातींच्या लोकांची

सेवा विनामोबदला करणे हे काम कनिष्ठ जातीचे. ही भारतामध्ये जातीआधारीत समाजव्यवस्था होती. अण्णा भाऊ साठे ज्या जातीतून आले होते, ती जात समाजव्यवस्थेतील सर्वात खालची होती. या शोषित माणसांच्या दुःखाच्या कारणांचा शोध घेत अण्णा भाऊ साठे यांचे विचार प्रकट झाले आहेत. त्यांच्या लेखनात सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय, धार्मिक प्रश्नावर त्यांनी विचार मांडले. त्यांच्या विचाराचा आधार वर्ग कधीच नव्हता. वर्गव्यवस्था ही विषमताधिष्ठित समाजाची निर्मिती करते असे त्यांचे मत होते.

सामान्य माणसाचे विषमताधिष्ठित समाजव्यवस्थेने धर्माच्या नावाखाली अनेक वर्षापासून शोषण केले आहे. त्यामुळे सारा समाज अज्ञान, अन्याय, दास्य यांच्या गुलामीत खितपत पडला आहे. त्या समाजात जाणीव जागृती करण्याचे कार्य महात्मा फुले, शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांच्या विचारातून, लेखनातून केले. ज्ञानी समाजास स्वातंत्र्य, समता आणि सामाजिक न्याय याची जाणीव असते. त्यासाठी तो समाज सतत संघर्ष करत असतो. अशा समाजाला जागृत करण्याचे कार्य अण्णा भाऊ साठे यांनी केले. देव, धर्म आणि संस्कृतीच्या नावाने चाललेले विविध क्रूर प्रकार यावर त्यांनी लिखाण केले. कथा, कादंबरी, शाहिरी यांच्या माध्यमातून अंधश्रद्धेवर टिका आणि विज्ञानावर विश्वास अशी विचारधारा महात्मा फुले यांच्या समतेच्या पायवाटेवरून प्रवास करीत आंबेडकरांच्या विचारवाटेवरून प्रवास करीत समाजातील सामान्य माणसांपर्यंत ही समतेची चळवळ पोहचवली.

विषमतावादी समाजव्यवस्थेतील बेटी बंदीची प्रथा ही विषमतेचे कायम रक्षण करते. बेटीबंदीची प्रथा बंद केल्याशिवाय आपल्या देशातील विषमता कधिही नष्ट होणार नाही. असे अण्णा भाऊ साहेबांना वाटते. जातीव्यवस्थेने लादलेल्या बेटीबंदीच्या नीयमांचे मानवी जीवनावर किती वाईट परिणाम होतात याचे विवेचन त्यांच्या आवडी कादंबरीत केले आहे. जातिभेदविरहीत समातावादी समाज मानसिकता निर्माण होण्याची आवश्यकता ते प्रतिपादित करतात. बेटीबंदीची प्रथा मोडून आंतरजातीय विवाह केले पाहिजेत व त्याद्वारे सर्व जातींमध्ये रक्ताचे संबंध प्रस्थापित करून टिकावू अशी समता निर्माण केली पाहिजे याचे वर्णन अण्णा भाऊ साठेंनी मुर्ती या कादंबरीतून केले आहे. या देशातील सर्व प्रकारच्या विषमतेला व गुलामगिरीला नष्ट करून सर्वच पिडीतांनी एकत्र येऊन त्याविरूद्ध संघर्ष करण्याचे ते आवाहन करतात. विषमतावादी जग बदलून टाकण्यासाठी बुद्धीवादी व समतावादी विचारांचे घाव घातल्याशिवाय पर्याय नाही. त्याशिवाय समाजाची पिळवणूक थांबणार नाही व भेदभावाचे प्रकारही थांबणार नाहीत. यासाठी आर्थिक, सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक गुलामगिरीमधुन बाहेर पडून, सर्वांनी संघटित होऊन सर्वच गुलामगिरी नष्ट करून स्वाभिमानाने माणूस म्हणून जगण्यासाठी सर्वांनी एकजुटीने लढत राहिले पाहिजे हा क्रांतिकारी विचार अण्णा भाऊ साठे यांनी त्यांच्या लिखाणातून प्रभावीपणे मांडला.

अण्णा भाऊ साठे यांनी स्त्रियांनाही समतेचे सर्व हक्क मिळाले पाहिजे असा विचार त्यांच्या साहित्यातून मांडला आहे. भारतीय समाजव्यवस्थेत स्त्रियांचे स्थान हे दुर्बल, अबला असे आहे. त्यांना दिली जाणारी वागणूक मानवतेला कलंक लावणारी आहे. स्त्री ही केवळ भोगाचे साधन

ISBN : 978-93-83672-76-9

नसून ती पुरूषांच्या बरोबरीची आहे अशी समतावादी भूमिका त्यांनी मांडली. त्यांच्या कथा, कादंब-यांमधून येणा-या स्त्रीया केवळ चुल आणि मुल सांभाळणा-या नाहीत तर पुरूषांच्या बरोबरीने कार्य करणा-या आहेत. मानवी समाजाने स्त्री वर्गाचा आदर व सन्मान केला पाहिजे असा विचार प्रकट केलेला आहे.

अण्णा भाऊ साठे यांनी जातीव्यवस्थेबद्दल त्यांच्या अनेक कादंब-यांतून लिखाण केले आहे. वर्णवादाविरोधात व जातीअंताच्या लढ्यासाठी सातत्याने प्रयत्न केले. जगातील सर्व माणसं सारखीच असुन ती जन्माने स्वतंत्र आहेत. त्यांना कोणत्याही कारणाने हीन लेखणे हे अमानवी कृत्य आहे. हा विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीचा गाभा होता. अण्णा भाऊ साठे या विचारापासून दुर राहणे अशक्य होते. माणसाला केंद्रबिंदू मानुन माणसाच्या सामाजिक गुलामगिरीविरूद्ध संघर्ष होत होता. पाण्याच्या तळ्यावर जनावरांना पाणी पिण्यास प्रवेश होता. पण माणसांना पाणी पिण्यास बंदी होती. मंदीरात अस्पृश्यांना प्रवेश मिळत नव्हता. त्याविरूद्ध डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी चळवळ उभारली होती. भारतात जात हे वास्तव आहे. ती मोडण्यासाठी अखंड संघर्ष करणे, त्यासाठी एकमेव मार्ग म्हणजे ही चळवळ आहे. स्वातंत्र्य-समता व बंधुत्वावर आधारलेला वर्ग, वर्ण, जातिहीन समाज त्यांना हवा होता. हे सर्व मर्म अण्णा भाऊ साठेंच्या साहित्यात आढळते. त्यांनी आपले विचार संकुचित आणि मर्यादित ठेवले नव्हते. ते विशाल होते. त्यांच्या लेखणीचे तेज उपेक्षितांच्या, दलितांच्या जीवनातील अंधार दूर करण्यासाठी होते, गुलामीकडून स्वातंत्र्याकडे, विषमतेकडून समतेकडे, शोषणाकडून सुखसमृद्धीकडे आणि अन्यायाकडून न्यायाकडे जाणा-या वाटा शोधण्याचा त्यांनी सातत्याने प्रयत्न केला.

भारतात गरिब-श्रीमंत, स्पृश्य-अस्पृश्य, शोषित-शोषक असे सामाजिक स्तरीकरण आहे. जात-धर्मामुळे होणारी पिळवणूक संपावी, दारिद्रय विषमता नष्ट व्हावी आणि समता प्रस्थापित व्हावी. या आर्थिक समानतेतून सर्वांना जगणे सुसह्य होईल अशा समतेचा पुरस्कार अण्णा भाऊ साठे यांनी केला आहे. आर्थिक मुक्तीचे आणि आर्थिक स्वातंत्र्याचे संघर्ष त्यांच्या साहित्यातून आले आहेत. आर्थिक समतेशिवाय इतर समतेला व बंधुत्वाला अर्थ नाही आणि आर्थिक समतेतूनच समाजातील सर्व समता प्रस्थापित करता येईल असा विचार त्यांनी मांडला. अण्णा भाऊ साठेंच्या समतेच्या आणि न्यायाच्या कल्पनेतील समाज वास्तव रुपात आणण्याची गरज आहे. त्याशिवाय समाजातील विषमता नष्ट होऊन समता प्रस्थापित होणार नाही हे नक्की.

**संदर्भ सूची :-**

१) डॉ. रावसाहेब कसबे (संपा.), समता (विचार / व्यवहार / भवितव्य), दादासाहेब रुपवते स्मृती ग्रंथ, दादासाहेब रुपवते, फाऊंडेशन मुंबई, २०००.

२) साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे, निवडक वाड्मय (कादंबरी, खंड-१), साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे, चरित्र साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन, २०१७.

३) प्रा. रामनाथ चव्हाण (संपा.), लोकशाहीर अण्णा भाऊ साठे (गौरवग्रंथ), लोकशाहीर अण्णा भाऊ साठे अध्यासन, पुणे विद्यापीठ, पुणे - ७, २००७.

४) डॉ. पी. विठ्ठल, डॉ. राजेश्वर दुड्कनाळे (संपा.), जनवादी साहित्यिक : अण्णा भाऊ साठे, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २०१७.

५) डॉ. शिवाजी जवळगेकर (संपा.), जननायक अण्णा भाऊ साठे, साहित्यभूषण अण्णा भाऊ साठे, कला अकादमी व संशोधन केंद्र, लातूर २००७.

६) डॉ. माधव गादेकर, अण्णा भाऊ साठे : साहित्य मूल्यमापन, साद प्रकाशन, औरंगाबाद, २०११.

७) प्रा. रमेश करडे, बहुजननायक अण्णा भाऊ साठे, मुक्तरंग प्रकाशन, लातूर, २००७.